Publication: Lokmat
Date: 10/11/2019
Page: 1
Column: 1

लोकमत मुंबई, रविवार, दि. १० मार्च २०१९

## साप्ताहिक जनजागृती मोहिम

मुंबई : राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त अदानी या वीज कंपनीतर्फे ग्राहकांसाठी साप्ताहिक जनजागृती मोहिमेचे आयोजन कुर्ला पश्चिमेकडील जरीमरी येथे करण्यात आले होते. याद्वारे ग्राहकांना विद्युत सुरक्षेच्या उपायांबाबत माहिती देण्यात आली. नॅशनल सेफ्टी कौन्सिलचे नेतृत्त्व या मोहीमेला मिळाले आहे. ही मोहिम यंदा ४८ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. या मोहिमेची संकल्पना 'राष्ट्रनिमार्णासाठी सुरक्षा उपाय वाढवणे व टिकवणे' ही आहे. २४ ठिकाणी आठवडाभर ही जनजागृती मोहिम चालणार आहे. सेफ्टी टीमकडून युवांना विद्युत सुरक्षेच्या उपायांबाबत माहिती दिली जात आहे.